# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
## दापोली..

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता.दापोली, जि.रत्नागिरी.४१५७११.

---

जा.क्र./मसकें/प्रअपां/प.मदा./२६७/१९९१/२०२१   दिनांक 6 SEP 2021

08 SEP 2021

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी विभागामध्ये प्रक्षेत्र सहाय्यक ठेका पध्दतीवर ०७ महिने या कालावधीसाठी भरणे आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी दिनांक २०.०९.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली यांचे कार्यालयामध्ये अर्ज सादर करावेत. उपरोक्त दिनाक व वेळेनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर अनुषांगिक माहिती खालीलप्रमाणे

| अ. क्र. | योजनेचे नाव | पदनाम | पदसंख्या | कर्तव्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, " पांगारी विभाग" | "प्रक्षेत्र सहाय्यक" ०७ महिन्यासाठी | १ | " पांगारी विभाग" मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. |

• शैक्षणिक अर्हता व इतर पात्रता:—

१. उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि पदवि आणि पदविका परिक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.

२. उमेदवाराजवळ किमान १ वर्षाचा प्रक्षेत्रावरील कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

• पदासाठी अटि व शर्ती:—

१. ठेकेदाराने सादर केलेल्या उमेदवाराचे वय अर्ज केलेल्या दिनांकास ३३ वर्षापेक्षा अधिक असू नये. मागासवर्गीय उमेदवारासाठी शासकिय नियमांनुसार वयोमर्यादा शिथिल आहे.
२. सदर नियुक्ती ही फक्त ०७ महिन्यांसाठी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीची राहिल.
३. सदर तात्पुरता ठेका हा कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाबींच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबुन राहील. तपासणी अहवाल आक्षेपार्ह असेल तर कोणतीही पुर्व सूचना न देता सदर ठेका रद्द करण्यात येईल व त्याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.
४. ठेकेदाराने त्याचा अर्ज संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता. दापोली, जि.रत्नागिरी या कार्यालयामध्ये सादर करावयाचा आहे.
५. निवड झालेल्या ठेकेदारास रक्कम रु.१००/—च्या बॉन्ड पेपरवर हमिपत्र देणे बंधनकारक आहे.

कृषि ०५१२-५१५७ क६

५. निवड झालेल्या ठेकेदारास रक्कम रू.१००/—च्या बॉन्ड पेपरवर हमीपत्र देणे बंधनकारक आहे.

६. ठेकेदाराने पुरविलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास राजीनामा हा एक महिना आधी लेखी लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे. अन्यथा ठेकेदारास एक महिन्याचे वेतन या कार्यालयास जमा करावे लागेल.

७. सदर पदावरील नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असून डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामध्ये कायम स्वरूपी नियुक्तीसाठी पात्र /हक्क प्राप्त नाही.

८. संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली यांना अपुर्ण अर्ज फेटाळण्याचा अधिकार राहिल.

९. जर ठेकेदार अर्ज दिनांकाच्या वेळी अन्य कोणत्याही कार्यालयात सेवेत असेल तर ठेकेदारास त्या कार्यालय प्रमुखाचा ना हरकत दाखला अर्जासोबत सादर करावा लागेल.

१०. पोस्ट टपाल वाटपामधील उशिराबाबत हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

११ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४४३/९० चे निर्णयानुसार या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत ठेकेदाराचा कोणताही हक्क राहणार नाही.

१२ ठेकेदाराचे देयकातुन शासकिय नियमानुसार विविध करांची कपात केली जाईल.

१३ ठेकेदाराने प्रती महीन्याचा प्रती **प्रक्षेत्र सहाय्यक** या पदाचा वेतन दर स्पष्ट आकड्यामध्ये व अक्षरी नमूद करावा.

वरील प्रमाणे मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली वाकवली विभाग येथे ठेका पध्दतीने काम करणेस इच्छुक ठेकेदारांची उमेदवारी शैक्षणिक अर्हता, कामकाजाचा अनुभव, इतर अर्हता आणि उपरोक्त काम करण्यासाठी अपेक्षित मानधन इत्यादी बाबी नमुद करून दरपत्रक दिनांक २०.०९.२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत किंवा त्यापुर्वी संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली यांचे कार्यालयामध्ये पोहोच होतील अशा रितीने सादर करावीत. कामाचा अनुभव, संबधीत विषयाचे ज्ञान आणि शैक्षणिक अर्हता या बाबी ठेका निश्चित करताना विचारात घेण्यात येतील.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र
वाकवली
ता दापोली जि रत्नागिरी